# राज्यस्तरीय कृषी व पशुपालन आधारित उद्योजकता विकास कार्यशाळा

प्रशिक्षण व शिक्षण केंद्र (ICAR-IVRI Pune), पुणे यांच्या वतीने महाराष्ट्रातील युवकांसाठी एक दिवसीय राज्यस्तरीय उद्योजकता विकास कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. कृषी व पशुपालन क्षेत्र हे भारतातील सर्वात मोठे रोजगारनिर्मितीचे क्षेत्र असून, या क्षेत्रात स्वरोजगार, उत्पन्नवाढ आणि शाश्वत उपजीविकेच्या अमाप संधी उपलब्ध आहेत. या कार्यशाळेच्या माध्यमातून युवकांना उद्योजकतेबाबत मार्गदर्शन, प्रेरणा व व्यावहारिक माहिती दिली जाणार आहे.

## कार्यशाळेची वैशिष्ट्ये

- ५ सत्रांची सखोल मार्गदर्शन कार्यशाळा
- ICAR च्या राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन
- कृषी व पशुपालन आधारित उद्योग संधींची सविस्तर माहिती
- यशस्वी उद्योजकांचे अनुभव व उदाहरणे
- युवकांसाठी प्रेरणादायी व संवादात्मक सत्रे

## कार्यशाळेचा तपशील

📅 दिनांक: २७ फेब्रुवारी २०२६

🕐 वेळ: सकाळी ११:०० ते ४:००

💻 कार्यपद्धती: ऑनलाईन Zoom द्वारे

🎟️ नोंदणी शुल्क: पूर्णतः मोफत

🗣️ कार्यशाळेची भाषा: मराठी

📜 प्रमाणपत्र कमावण्याची सुवर्णसंधी**

Click here for Registration

## कोण सहभागी होऊ शकतात?

- बेरोजगार युवक / युवती
- उद्योजक होण्याची इच्छा असलेले युवक / युवती
- पशुपालक शेतकरी / शेतकऱ्यांची मुले–मुली
- उद्योजकतेच्या क्षेत्रात स्वतःचे नाव करू इच्छिणाऱ्या मुली, युवती व महिला
- कृषी, पशुपालन किंवा पूरक व्यवसाय करण्याची इच्छा असलेले युवक / युवती

## नोंदणी – अत्यंत महत्त्वाच्या सूचना

- येथे दिलेल्या लिंकवार क्लिक करून नोंदणी करा
- अथवा, QR कोड Scan करून नोंदणी करा
- नोंदणी करताना खालील माहिती अनिवार्य आहे:
  1. पूर्ण नाव; 2. ई-मेल आयडी 3. व्हॉट्सॲप मोबाईल नंबर
- उद्योजकतेची आवड (उदा. दुग्धव्यवसाय, शेळीपालन इ.)
- या पुढील सर्व सूचना ई-मेल व व्हॉट्सॲपवरूनच दिल्या जातील

**प्रमाणपत्राबाबत माहिती: सहभागासाठी कोणतेही शुल्क नाही. प्रमाणपत्र मिळविण्यासाठी IVRI च्या संशोधन प्रकल्पासाठी एक फॉर्म भरावा लागेल, त्याची माहिती नोंदणी नंतर दिली जाईल.